म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र. ५७ १८८८

नं १५२ ८० सन १८८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु नांव — अफजुलखानाच्या मृत्यूचा फार्स
ले — हरिभाऊ बाबाजी
विषय — नाटक

१५२

नाटक

॥ श्री ॥

# अफजुलखानाच्या मृत्यूचा फार्स.

हें पुस्तक

## हरिबा बाबाजी

यानीं

तयार केलें तें.

मुंबईत

"बॉम्बे सीटि छापखा॰ छा॰,,

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें रजिष्टर करून सर्व प्रकारचे हक्क-प्रकाशकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

शाके १८१० सन १८८८

किंमत ६ आणे.

# ऐंद्र जालिक कार्ड चतुष्टय.

## ( जादूचा अद्भुत कार्ड )

बंडल नं. १ - दृश्या दृश्य इंद्रजाल व बंडल नंबर २ नाना रंग रूप धारक मायावी कार्ड - हें कार्य पड्यांचें किं वा डबल नसतां ही त्यांवरील ठिपके व रंग देखतां देखत सात वेळां निरनिराळ्या प्रकारें अकस्मात बदलले जातात या निर्जिव कार्डांपासून अशा प्रकारचे अद्भुत चमत्कार हो- तात. हें पाहून अति चतुर मनुष्याची ही अक्कल अगदीं गुंग होऊन जाते. त्या कार्डामध्यें हा अद्भुत गुण नेहेमीं कायम रा हील. प्रत्येकानीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहावा. बंडल नं. ३ अजिंक्यकार्ड- यांच्या योगानें नियमित संख्या इतरांस पूर्ण करतां येतच नाहीं ती आपणच पूर्ण करूं. बंडल नं० ४ मनः कल्पित इष्टांक दर्शक कार्ड- यांच्या योगानें कोणी ही म नांत धरलेला अंक आपणास तात्काल व बिनचुक सांगतां येतो. वरील चार बंडलां सह- त्यांपासून चमत्कार करून दाखविण्या च्या माहितीच्या पुस्तकाची किंमत सर्वांची फक्त एक रुपया वट पाल ख० रव० १ आणा पडेल.

याचक हो तुह्मी अनेक गोष्टीसाठीं शेंकडो रुपये खर्च के ले असतील तर आतां त्या १ रुपया कडे न पाहतां हें कार्य घेऊ न त्याच्या योगानें आप आपल्या इष्टमित्र मंडळीस नाना प्र कारचे नजर बंदीचे अति अद्भुत चमत्कार दाखवून त्याचें म नरंजन व कर्मणूक करा व हा काय चमत्कार आहे त्या ब- द्दल त्यास अति आश्चर्य भरीत २ करून गुंदांत पाडा. !!

॥ श्री ॥

# अफजूल खानाच्या मृत्यूचें फार्स.

प्रवेश १.

( शिवाजीच्या छावणीची जागा. )

पात्रें.

गोपाळराव आणि माधवराव. असे दोघे कारकून

प्रवेश करितात.

गोपाळराव.- नमस्कार माधवराव नमस्कार आज आप-
ल्या तरी भेटीचा मोठा लाभच झाला असें समजलें पाहिजे.

माधवराव.- कांहो गोपाळराव, तुह्मीं सदा सर्वदा महाराजा
च्या हुजुर असता त्या योगानें सर्व माहिती तुह्मांस असली-
च पाहिजे. आह्मांस कांहींच वर्तमान समजत नाहीं. तशांत-
जामदार खान्यांतील खरचाचें काम असल्यानें वरमान करा
वयास सुध्दां सवडनाहीं ह्मणून ह्मणतों आणखी कांहींनाहींहो.

गोपाळराव.- एकूण आपणास दरबारी हकीगत ऐकण्या
ची इच्छा आहे काय? सांगतो तर आतां तुह्मांस काय विचार-
वें असेल तें विचारा.

माध.-(मोठ्या संतोषानें) गोपाळराव, आपल्या महाराजांचें-
तरी धैर्य किति ह्मणुन वर्णन करावें पहा त्याणें मोंगलाच्या सरदाराचा
तर चुराडाच करून टाकिला. हे तर तुह्मांस माहितच आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

गोपाळराव०-माधवराव आपल्या महाराजांच्या धैर्या विषयींतर सीमाच झाली· पर्वता सारखे अचळ मोठ्या तुफान घोड्यावर बसून भाला, बोथाटी खेळणें तसीच महा अरण्यांत व्याघ्रादिकांचि शिकार मारणें, या कामांत तर त्याचा हातखंडाच समजला पाहिजे· आजसुमारें चारपांच महिनें झाले सदाशिवभट मुळें मुलाच्या लग्नाकरितां कांहीं द्रव्य पाहिजे ह्मणून मागावयास आले होते त्यास महाराजानीं लागले च ८०० रुपये देऊन रवानगी केली· औदार्यतर याप्रमाणेंच आहे· अहोजे थोर ते थोरच दयातर जाती पुष्पा समान कोमल आहे· तेजस्वीपणातर या भूमंडळांत प्रकाशमान सूर्यनारायणा सारखाच विराजमान·

माधवराव०- आपल्या महाराजांची शांतीतरी किती ह्मणून वर्णन करावी· जसाकाय सागरच शस्त्रधारण करणाऱ्यांत कोक मोंगलाचे सरदार तारीफ करितात· गायी ब्राह्मणा विषयीं फारच सदयता·

गोपाळराव०- माधवराव, आणखीं माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं, कोठें जाणें येणें किंवा स्वारिची चपलता आणि प्रसंगीं कोठें गुप्त व प्रकट होणें या बद्दल जी आख्या आहे ती मीं किती ह्मणून सांगूं·

माधवराव०- गोपाळराव· काय चमत्कार सांगावा· मोंगलांकडील फौज आली कीं तात्काळ त्यास यमसदनी पाठविलेंच अशा कामीं विलंब ह्मणून मुळींच नाहीं

गोपाळराव०- एकूण मावळे लोकांची तर कमालच झाली असें ऐकण्यांत आहे·

माधवराव॰- कमाल ह्मणून काय विचारता मोंगलां कडून स्वांर सिबंदि· आलीकीं त्याणीं फडशा पाडलाच ते लोक फा रच कडवे आहेत·

गोपाळराव॰- माधवराव- माला माहाराजांचें दर्शन हो ऊन फार दिवस जाहाले करितां आपले समागमें स्वारींतये ण्याची इच्छा आहे·

माधवराव॰- ( फार उत्तम- चलावें आपला समागम सु खास्पद मीं मानील ( असें ह्मणून उभयतां निघून जातात·

प्रवेश २ रा·
पात्रें·

बादशाहा- बिरबल, फौजदार -सरदार- आफजुल खान· भालदार·



(बादशाहा तक्तावर बसला असतां पडदा उघडतो.)

भाल०- दिल्लीपद बादशाहा दौलतजादा मेहेरबान सलाम आप आपने जगेवर आद बसे बैठना

( सर्व येऊन मुजरा करतात. )

बाद०- क्यों बिरबल. आपनि रिया सतमो. शिवाजी भोंसला इस नामसें. कोई फीषादी उठाहैं उन्ने आपने मुलुख की बोहोत खराबी और नुकसान किया हैं- उसीका बंदोबस्त करना. मुनासिब हैं.

बिरबल०- (हात जोडून) गरिबनवाज. आपने तरफसे- बडेबडे आमिर उमराव. उसीके बंदोबस्त खातर जाते रहेलेकीन कोई समे उसकेसाथ सामना होकर जस मिलाया नहीं. मिस्कीन माफिक भगते है वास्ते मेरा इरादा येहि हैके कोई सरदारके साथ जंगी फौज देकर रवाना करना चाहिये.

बाद० बिर०- तुमने जो कहा सो सच्चा हैं लेकीन. आपने फौजकी तयारीके लीये नीगाबानीकरना चाहीये.

बिर०- खुदायवंत- आपका हुकूम मुनासब हैं.

बाद०- फौजदार, आपने फौजकी तयारी किस तरेसे रखि है सो बयान कहो.

फौजदार०- (मुजरा करून) गरिबनवाज. आपने फौजमें घोडेसवार, आरब, सीक मिलके तिसहजार फौज- हतियारबंद सामनेकी रहा देखते हैं और पांच हजार रजपूत मेरे आरदलेमे परटके काम करनेवाले ओंही जिस वख्त हुकूम होवेगा सोही वख्त दुष्मनकेंसिस काटके.

तसरिफ करनेके इरादेमें हैं॰ इसी मुजब फौजकी तया-
री हैं॰

बाद॰- फौजदार बहोत आच्छा, तयारी हे लेकीन येफौ
जकोई सरदारके तावे करना हक्क है॰

बीरब॰- खुदाय वंद॰ हुजूरकी फर्माष होना चाहिये के
समसेर बाहादूर अफजुलखान को बुलायके दुष्मनके सा
मने पर भेजवा देना और उसीको फौजका सरदारी मुक-
रार कर देना॰

बाद॰- ( स्मरण जालें सें करून ) बीरबल बहोत आ-
च्छा याद किया- कोन हेरे आफजुलखान को बुला लाव॰

भाल॰- जो होकम खाविंदका ( निघून जातो॰ )

भा॰- दिल्लीपद बादशाहा दौलत जादा मेहेरबान आफ-
जूल खान के खुरनिसपर निगाररखो॰

आफजूलखान॰- ( बंदगी आदाब॰) इस बंदेको क्या-
फरमाष होती हैं मैं ये समसेरके जोरसें और हुजूरकेतु
फलसे कोई दुष्मनकुं मानता नहीं हुं॰

बाद॰- खानसाब॰ आपने रियाशतमो शिवाजी भोसला
इस नामसे कोई दुष्मन उठा हैं और उन्ने आपना बहोत
नुकसान किया हैं वास्ते उसीके साथ सामना करके अवा
दी करने खातर आपके बुलाया है॰

आफ॰- जो होकम मेतो शिवाजीको चुव्हे मा-
फिक जानता हुं सबबके ओ मेरे साथ सामनेमे ठेरेगा न
हिं वास्ते अरज करता हूं के येही तरव्त आगे हाजर कर
ताहूं इसलीये आपके दिल मोफकर नहिं रहना ( व॰ पा

हुन. यामालक तेरी कुदरत अजब्ब है)आसे ह्मणू न हुजुरास ),इसरीया ग्रतमो समसेर बाहादूरके रहेसे- आफत गुजरनाबी आचंबेकी बात हें वास्ते आरज करता हूंके मेरेसाथ दारु गोला सो हतियार बंद फौजकी मुकरा री होना चाहिये मेरी तयारी हें.

बाद०- बहोत अच्छा तुमारे साथ मे फौजकी तयारी हें. आब तुमारे कुचकी देरी हे.

आ०- बंदा ये समशेर से तयार हें जो हूकम- मालीकका

बी०- खावींद एसे समशेर बाहादरके साथ एक वकील- मुकरार करना चाहिये. सबबके बहोत ग्रुगतसे और हु- ग्नारीसे दुष्मनको काबीज करना हे. लेकीन जो होकम हो गा उसी मुजब तयारी कर देता हूं.

बा०- बहोत अच्छा-कोन हे रे भालदार.

भा०- ( मुजरा कर के ) जो होकम- ये बंदा ताबी दारी मो हाजीर हें.

बा०- गोपीनाथ वकीलको बुलालावो

भा०- जोहोकम ( असेंबोलून ) वकिलास घेऊन येतो.

गो०-( मुजरा करून ) महाराज सेवकास काय आज्ञा ती फरमाष व्हावी तावेदारीस हाजीर आहे.

बा०- बीरबल- वकीलका सब अहवाल बयान करो.

बी०- बहोत अच्छा-( असें असून गोपीनाथ पंतास- ) पंत सरकारची आज्ञा हीचकीं आपले राज्यांत वाई सा- ताऱ्याकडील शिवाजी भोंसला ह्मणून आपले शाहाजी- सरदारचा मुलगा बंडखोर जाहला त्याजवर आज पावेतों

पुष्कळ फौज देऊन सरदार पाठविले परंतु त्याणें त्यास त्यांचा पराजय करून आपला आमल बसविला यामुळें दरबारांतून समशेर बहादूर आपले आफज्जूलखान यांची त्यांवर योजना केली आहे व त्यास युक्तीनें धरून आपणा साठीं त्यांचे बरोबर तुह्मांस मुरब्बी नेमले आहे तेव्हां तुह्मीं स्वारींत जाणेची सिद्धता करावी.

गो० - महाराजाची आज्ञा होईल तसें करण्यास मि सिद्ध आहें.

बा० - आफज्जूल खान साहेब आपकेसाथ सवारीमें हुजुरसे गोपिनाथपंत वकीलकी मुकारी है आब मोहीमकी तयारी करना.

आ० - बहोत अच्छा गोपीनाथपंत चेलो हमारेसाथ (असें ह्मणून हुजुरास मुजरा करून जातात. )

## प्रवेश ३ रा

( स्थळ अफज्जूल खानाचा बंगला. )

पात्रें.

अफज्जूलखान. गोपीनाथपंतवकील.



( अफजूलखान आपले बंगल्यांत बसले असतां गोपि
नाथपंत प्रवेश करितो· )

गो०-( मुजराकरून ) कां खानसाहेब· कायहोत आहे ?
आ०- पंडत· आवो· आच्छा हुवाके तुमको दरबारसें ह
मारे साथमें चलनेकी फरमाष हुई आब येहि करना हैके
हर तजविजसे· दुष्मनकु पकडकर हुजूरके आगे लाना·
इतनेमे तुमारी और हमारी बदती होगी लेकीन नजानो·
कोनसे वख्त क्या फीषाद होगा येही बिचार अव्वल कर
ना चाहीये·

गो०- खानसाहेब आपण त्याजबद्दल तिळमात्र काळ
जी करूनये· आता प्रथम असा बंदोबस्त ठेविला पाहिजे
कीं सरकारांतून आपले बराबर फौज किती मिळेल व ति
कशि हुषार आहे· या विषयीं खात्री जाली ह्मणजे बाकी
चे विचार पुढें करतां येतील·

आ०- आपनेसाथ फौजकी कडी कोट तयारी है इसबात·
का अंदेसा नहीं करना· जब ओ मरेठा हमारे सामने आवेगा
ओही वख्त हमक्या तजवीज करेंगे सो तुम देखते रहेना· ह
म उसीकु छोडनेवाले नहीं·

गोपि०- खानसाहेब आपण तसेच पराक्रमी आहांत या
समयीं मला कांहीं अंदेशा आहे असेंनाहीं परंतु तिकडे गु-
प्त हेर पाठविले आहेत कांहीं त्यांचा सुमार समजला ह्म
णजे त्यांच्यावर चढाई करून जाण्यास ठीक पडेल मलाअ
सें वाटतें कीं वहून करून आपल्या हेराची आता यावयाची
सीघ्रका [illegible] आहे·

आ०-गोपिनाथ पंत यहि वखत आपना जासूद आजायगा जद सब खबर मालुम हो जायगी फेर उनकी तरतूद देख लेउगा·

गो०- बरें आहे·

( इतक्यांत जासूदप्रवेश करितो· )

जा०-( मुजराकरून· ) महाराज, सातान्यास शिवाजी राहण्यास जाऊन त्याणीं आपला तोरणा किल्ला घेतला तसेच जावली ठाण्यास जाऊन तेथून आपला मुकुंदराव कृष्णा-सोमण कमाविसदार याजला कैदेंत ठेऊन आपलें ठाणें त्याणें बसविलें याजवर आपल्यास अधिक काय बंदोबस्त करावयाचा असेल तसा करावा·

आ०- गोपिनाथपंत ये क्या कहता हैसो सुन लेना और मराठेनेतो बहोत धूम मचाई है·

गो०- खानसाहेब, आतां त्याची उपेक्षा करूंनये· कारण जों पर्यंत शत्रूचें प्राबल्य झालें नाहीं तोंच त्याचा नाश करावा· अशी न्यायाची रीत आहे· आतां अगोदर सातान्यास जाऊन किल्ला घेतला पाहिजे· सर्व कांहीं आपलें कार्य साधणार आहे· जर करितां उशीरकेला तर कांहींच व्हावयाचें· नाहीं ह्मणून ह्मणतों आणखीं कांहीं नाहीं·

अ०- सुनो गोपिनाथपंत अविजाके दुष्मनकी कतल करताहूं चलो·

गोपि०- ह्मीं घोड्यावर बसलों पहा·

अ०- बहोत अच्छा है ( असें ह्मणून दोघे निघूनजातात· )

# प्रवेश ४ था

## पात्रें

शिवाजी, तानाजी, बाजी, गोपिनाथपंत आणि अफजुलखान.



गोपिना०— खानसाहेब आपण सरकारचा हुकूम घेऊन विजापुराहून सातान्यास येऊन पोहोचलों. आतां आपण या माहुली संगमावर आपले डेरे राहुट्या देऊन छावणी करून राहाण्याचें करावें ह्मणजे झालें. व मीं एकाकी जाऊन शिवाजीच्या मुत्सदीस भेटून काय हकीगत आहे ती पाहातों.

अफ०— गोपिनाथपंत बडे जुगतीसें जाके शिवाजीकी मुलाकत लेना और शिवाजी क्या कहता हैं सो सुन लेना फेर क्या करना हैं सो देखलेंगे.

गोपि०— बहुत उत्तम आहे आपण सांगितल्या प्रमाणें माहुलीवर छापा घातल्यास हुकूम देऊन मीं किल्यावर त्यास भेटण्या करितां जातों.

अफ०— बहोत अच्छाहैं (असें ह्मणून निघून जातात.)

पडदा पडतो.

शि०— तान्हाजी मालुसरा, बाजी फसलकर, येसाजी कंक, आणि दामाजीपंत असे बसले असतां पडदा उघडतो.

भाल०— दौलतजादा मेहेरबान सलाम अस्ते निगाररवो महाराज.

शिवा०— कां दामाजीपंत आपलें धोरण बरेंच चाललें आहेना. सामर्थ्यें तर कांहीं कमीं जास्त नसेलच. असो.

ताना०— कमीजास्ती ह्मणावया सारखें आहे असें नाहीं परंतु कालरोजीं हेरानीं अशी बातमी आणिली आहे कीं विजापुरचे सरकारानीं अफसुलखान नावाचे सरदाराबरोबर बरीच लढाई फौज देऊन रवाना केले आहेत. व तो सरदार परवांचे दिवशीं माहुली मुक्कामीं येऊन पोहोंचला. या प्रमाणें हे सांगतात तर या कामाची पुढें कोण कोणत्या प्रकारची व्यवस्था करावयाची आहे त्याविषयीं जशी सरकारची आज्ञा होईल त्याप्रमाणें करण्यांत येईल.

शिवाजी०— कांहो दामाजीपंत त्या मुसलमानानें अशी तजवीज केली आहे काय तरी आपल्याला हीपण त्याचा पराभव करण्या करितां कांहींतरी तजवीज केलीच पाहिजे. खरें किंवा नाहीं कां हो गोपिनाथपंत बोलत कां नाहीं (आपल्या सरदार मंडळीकडे पाहून) कां तानाजी बुवा कसें काय शत्रु तुमची भेट घ्यावयास आले आहेत तर आपल्या कडील सर्व सिद्धता आहेना आपले हेटकरी मावळे लोक आणि भांडारी आहेत. त्यासर्वांस नीट व्यवस्थेशीर सांगून ठेवावें. सर्व सामान सुमान नीट व्यवस्थेशीर ठेवावें. ह्म-

णजे झालें.

ताना० — सरकार त्या नोडग्याची काय विसाद आहे एका झपाट्यासरसी चुराडा करून टांकूं बगता काय - कां यसाजी कंक आपलें ह्मणणे काय हाय. इजापुराहून आफजूल खान मूनं एक सरदार आलाया आन पगा त्यो त्या माहुलीवर छावणी करून दोनचार दि० झाले मून दामाजीपंतबी ह्मणत्यात समजलें कीं नाहीं.

येसा० — आमचे मावळे एकदां खवळले कीं त्या मुसलमानाची खाची झालीच पगा.

बा० — काय राव ह्मणतां हानो उगा आलाकीं त्यासीं बदाडतो मंग असें ह्मणणार नाहीं कीं असं तसं माझ्या पपाचसे शमोसी कोळी विचार सहास हाय गोफन गुंडे सोडगी भडाभड मारून त्येचा परान घेईन कधीं बी सोडणार नाहीं इचारता काय आन पुसता काय.

शिवा० — कां दामाजीपंत आपल्या मंडळीची कडाकोट तयारी आहे आतां शत्रु जरी आला तरी त्याचा समाचार घेण्यास कांहीं हरकत नाहीं कां तानाजी मीं ह्मणतों हें खरें आहेना.

ताना० — सरकार आपण जे ह्मणतां तें समदेंच खरें आहे. त्या मंदि रेंस भर कमताई नहीं ( इतक्यांत गोपिनाथपंत शिवाजीची भेट करण्या करितां येतो असें पाहून. )

भाल० — दौलत जादा मेहेरबान सलामपर निगा रखो.

शिवा० — भालदार काय आहेरे

भाल० — महाराज विजापुराहून अफजुल खान सरदार आ

ले आहेत त्यांचे वकील गोपिनाथ पंत हे आपली भेट घे ण्याकरितां आले आहेत.

शि०—ठीक आहे दामाजीपंत अगोदर तुह्मीं त्यांस सामोरे जाऊन सनमानानें आणा.

दामा०—( हात जोडून ) आज्ञा महाराज ( असें ह्मणून त्यास घेऊन येतो. )

गोपि०—( मुजरा करून ) कां शिवाजी आपण आमच्या सरकारचे सरदार असून त्यांच्या राज्यांत बखेडा करितां तेव्हां असे कांहीं करूनये कारण आपले तीर्थरूप शाहाजी भोंसले हुजुरांत कामगिरीवर आहेत त्यांजवर कांहीं लक्ष द्या आतां सुज्ञास जास्त बोलणें नकोच.

शिवाजी०—गोपिनाथपंत आह्मीं सरकारचे ताबेदार आहोंच तेव्हां अशी गोष्ट आमच्या हातून व्हावयाचीच नाहीं आह्मीं काय "ताटखालचें मांजर" ज्याप्रमाणें आपले सरकार आम्हांस ठेवतील त्याप्रमाणें आह्मीं राहावें हाच आमचा धर्म आणि त्यांत हो काशाला तंटानि बखेडा पाहिजे.

गोपिनाथपंत०—अहो शिवाजीराव अहो दरबारांत प्रति दिवशीं, शिवाजीनें आज तोरणा किल्ला घेतला, कोणी ह्मणतात. वांइ प्रांतावर स्वारी केली कोणी ह्मणतात कीं शिवाजीनें मावळे लोक पुष्कळ ठेविले याप्रमाणें आपणा बद्दलच्या कागाळ्या येतात. आणि यासाठीं कोणीं आपण मला असें बोलता तर यामध्यें खरें खोटें कितपत आहे याचा विचार आपणच करावा.

शिवाजी०—कांहो गोपिनाथ पंत आपण ह्मणतां हें सर्वस्व

खरें परंतु बंडावा करणें, तोरणा किल्ला घेणें हें काम कायल हान सहान कीं काय? अहो तुह्मी असा विचार कराकीं तुम च्या येथें माझे तीर्थरूप नोकर आहेत आणि त्यांचा मी मुल गा मजपाशीं हो कशाचें सैन्यनी कशाचें काय बंडावा करण्या ला पैसा तर पाहिजे कीं ह्या चुली पासल्या भाकऱ्या करण्याचें काम आहे. आणि आह्मीं मुळचे डोंगरी आमचें काम काय तर इकडचे तिकडेनी तिकडचें इकडे फिरावें हेंच आह्मालायु द्ध करण्याला सामान काय लागतें व युद्ध कसें करावें याची मा हिती तर मुळींच नाहीं आणि जर आह्मांवर तुह्मीं असे भल तेंच कुभांड घेऊन लागलेत तर घ्या आमची कांहीं मनाई नाहीं.

गोपी०— तें आपलें मीं सर्व ह्मणणें कबूल केलें परंतु असें ह लकटा सारखें काय करणें हें आपल्यासारख्यास योग्य आ हे असें मला वाटत नाहीं.

शिवा०— ( दामाजीपंतास जवळ बोलावून त्याचे कानांत) अहो दामाजीपंत आपण ज्यासाठीं काम आरंभिलें आहे- तो सर्व उद्देश उघड करून एकवेळ गोपिनाथपंतास सांगा वा गोपिनाथपंत तुह्मीं जर आह्मांस मदत कराल तरमीं तुह्मां स ही वेरगांवची सनद करून देईन तर आपण अफझुल खा नास कांहीं तरी सांगून तो येथें बिन शस्त्रानें व बिन सैन्यानें येईल असें करा ह्मणजे आपलें कार्य झालेंच असें समजा हें कार्य आपले सर्वां करितांच करितों आहें असें आपण पक्केंस मजावें. यांत पुण्य होणारें आहे असें समजा कारण ह्या मु सलमानी राज्यात गो ब्राह्मणाचा फारच नाश होत चाल- ला आहे करितां यांत सारासार विचार करून जे करणें.

तें करावें.

गोपिनाथ०–हें एकून आंतली मसलत अशी आहे. काय मलाकाय माहीत असो महाराज जें आपण करितां तें सर्व बरोबरच आहे.

दामाजी०–गोपिनाथपंत आतां तुह्मांस जास्त बोलणें नको जर आपणास हिंदु धर्माचा अभिमान असेल तय या दुष्ट यवनाची नोकरी सोडून आमच्या मताप्रमाणें वागाल.

गोपिनाथ०– कांहो दामाजीपंत तुह्मीं ह्मणतां तें सर्व खरें पण अगोदर त्यांत आमचा प्रपंच साधून परमार्थाचा लाभघडेल अशी कांहीं तजवीज होत असेलतर पहा नाहींतर उगीच वंध्या मैथुन या प्रमाणें न व्हावें ह्मणजे झालें.

दामाजी०– अहोपंत तुह्मीं त्याविषयीं कांहीं काळजी करूं नका पहिल्यानेंच सरकारानें सांगितलें की तुह्मांस ही वेरगांवची सनद करून देतों मगकाय मात्र तुह्मीं मुसलमानाची-नोकरी सोडून द्यावी.

गोपिनाथ०– अशीजर सरकारची मर्जी आहे तर माझ्या कडून सिद्धताच आहे. असें समजा.

दामाजी०– आमच्या ह्मणण्यास आपण कबूल झालां येवढ्यानेंच आह्मीं फारच संतोषित झालों.

गोपिनाथ०– बहूत उत्तम आहे बरें सरकार आतां मला आज्ञा व्हावी.

शिवाजी०– आतां आपण आज्ञा मागतां तर मजकडून ही आज्ञा आहेच पण पुढें तिकडे गेल्यावर काय काय त्यांस सांगणार.

गोपिनाथ०- सरकार आतां त्या अफजूल खानास असें सांगतों कीं शिवाजी हा आपले प्रताप शस्त्रास्त्रें पाहून त्या स फारच भय वाटलें. असा बाह्मणा करून त्यास एकटाच- बिन हत्यारे आपणास भेटावयास येण्यास सांगतों ह्मण- जे झालें ना त्याच्यावर तुह्मांस जें करणें असेल तें करा.

शिवाजी०- पंतसाहेब याप्रमाणें तजवीज करून या ठि काणी घेऊन आलांत कीं त्याचा आह्मीं चांगलाच समाचा र घेतों असा समाचार घेतों कीं पुन्हा बादशाहास जाऊन- सांगण्यासच नकोणी ठेवणार नाहीं.

गोपिनाथपंत०- हें आपलें संभाषण ऐकून मनाचें समा- धानच झालें बरें तर आपल्या कडील सर्व सिद्धता करून ठेवावी. आतां मीं त्याचेकडे जाऊन असाच घाट करितां (अ सें ह्मणून निघून जातो. )

शिवाजी०- कांदामाजीपंत हें आज मोठें अरिष्ट आलें. होतें पण श्रीजगदंबेच्या प्रसादानें सर्वकाम तडीस जाणारें आहे. का तानाजीबुवा. बाजीराव कसें काय आह्मीं जो घाट केला आहे तो बरा आहेना एकवार तो आपल्या सपाळ्यां त आलाका बचमजीची चांगलीच चांदी करतां येईल.

येसाजी०- तानाजी बाजी आमचें बी मत असेंच आहे

शिवाजी०- आतां तो अफजूलखान माझ्या भेटीस येईल तो बिन हत्यारी येणार आहे तेव्हां तुह्मीं आपल्या लोकांची तयारी ठेवा आणि एकदम त्या मुसलमानाच्या लेंकांवर हल्ला करा व हर हर महादेव असा शब्द करा ह्मणजे मीं तित- क्यासंधींस आलेल्या सरदारास चांगलीच भेट देईन चला

जातों मीं आतां देवीच्या दर्शनास.

भालदार०- कचेरी बरखास्त ( असें ह्मणून सर्व निघून जातात.

## प्रवेश ५ वा

( स्थल माहुलीची छावणी. )

पात्रें.

( अफजुलखान सरदार गोपिनाथपंत वकील रहिम शिपाई.



अफजुल०- ( आपल्याशीं ) अब क्या करना, गोपिनाथपंत शिवाजी तरफेतरफ मिलनेकेवास्ते गयो हैं लेकिन आबीतक आया नहीं दुष्मन् छातीपर खडा हैं उसका कुछ भरो सा रखना नहीं ( उघड ) बाहेर कोन हैं.

रहि०-सरकारमें रहिम हैं क्या होकम होताहैं

अफजुल०- रहिम गोपिनाथपंत उदर आयाकीं नहीं उसका तलास करो·

रहिम०- बहुत अच्छाहैं ( असें ह्मणून बाहेर जातो आणि पाहून ) खाविंद पंडिततो आबीतरव आया नहीं लेकिन एक हलकारा आ के दरवाजेपर खडा हैं ओ कहता हैं गोपिनाथपंत शिवाजीकू मिलकर आये हैं·

अफजु०- बहोत अच्छाहैं जाके लेकर आवो·

रहिम०-हां साहेब ( असें ह्मणून त्यास घेऊन येतो· )

गोपि०-(बंदकीकरून )खान साहेब आपल्या आज्ञेप्रमाणें शिवाजीकडे जाऊन त्यास कळविलें आहे·

अफ०- अच्छा फेर क्या हुवा·

गोपिना०-खाविंद शिवाजी आपणास फार भीतो· करितां एकटे आपण बिनहत्यार भेटण्यास यावें असें त्याचें ह्मणणें आहे ह्मणून आपणास सुचवितों कीं कोणच्यातरी युक्तीनें धरिला पाहिजे·

अफजु०- मरेको· शिवाजी मरगया डरताहें येबी अच्छाहे ये बी अच्छा हैं अब ऐसें करिंगे ( असें ह्मणून त्याचे कांहीं कानांत सांगतो· )

गोपिनाथ०- खानसाहेब आतां मात्र विलंब करूं नये आपल्या फौजेची सिद्धता करून चालावेंच·

अफजु०- बहुत अच्छाहैं हमतो तयार हैं·

( असें ह्मणून फौजेसह निघून जातात· )

## प्रवेश ६ वा.

( स्थळ जिजाबाईचा महाल )

पात्रें

शिवाजी जिजाबाई आणि मोगरी दासी.



शिवाजी० -( आपल्याशींच ) अफजूनखान जरी आला तरी त्याचा वकील गोपिनाथपंत आपलासा करून ठेविला आहे. आतां त्यास बिन हत्यारी भेटण्याचे निमित्यानें येथें आणून त्याचे पोटांत वाघनखें रोवून प्राण घेतों मीं तर आपल्या प्राणाची आशाच ठेविली नाहीं कारण आपल्या धर्माची स्थापना होऊन गो ब्राह्मणाचें संरक्षण झालें पाहिजे ( उघड ) आतां अगोदर आई साहेबांचें दर्शन घेऊन नंतर मगजें काय करणें तें करावें.

( असें ह्मणून जिजाबाई साहेबांचे महालांतजातो. )

( जिजाबाई मंचकावर बसली असतां पडदा पडतो. )

जीजाबा० -कोण आहे गे दासी.

मोगरी० -( हात जोडून)जी बाई साहेब मीं मोगरी हायना·

जिजाबा०- बरें कालपासून शिवाजी माझेकडे आला नाहींअ शा कोणच्या गडबडींत आहे कोण जाणें पण जरकरतां एकक्ष- णभर त्याला पाहिलें नाहीं तर मला चैन पडत नाहीं आतां अ .गोदर जाऊन तो कोठें आहे याचा शोध करून ये बरें

मोगरी० -जी बाइसाब आतांच बघून सेनी येनें बगा (असें म्ह णून निघून जाते आणि शिवाजी तिला मार्गांत भेटतो ) सरका र चलाकी आईसाहेब बहाताती·

शिवाजी० -कोण मोगरी हा पहा मीं तिकडेच यावयास निघालों तूं पुढें जाऊन आईसाहेबाला मींआलों म्हणून वरदी दे·

मोगरी० - लइ बेस ( असें म्हणून पुढें जाऊन कळविते ) इत- क्यांत शिवाजी प्रवेश करितो·

शिवाजी० - पलंग चोकीचे पाहाऱ्यावर कोण आहे·

मोंगरी० - मीं मोगरी आहें सरकार·

शिवा० - मोगरी अगोदर जाऊन आईसाहेबांला जाऊन सांग कीं मीं आलों आहें म्हणून·

मोगरी० - जी सरकार( असें म्हणून आंत जाऊन येतो इत- क्यांत शिवाजी प्रवेश करितो· )

जिजाबा० -( शिवाजीस पाहून संतोषानें ) बाबा आलासरे अरे शिवबा जो तूं मला पूर्वी एक क्षणसुद्धा विसंबत नव्हतास नि आतां दोन दोन दिवस तुझें मुखकमल सुद्धां माझे दृष्टी स पडत नाहीं·

शिवाजी० - (वंदन करून ) आईसाहेब कालकिने मीं थोडा स्या गडबडींत असल्या कारणानें आपलें दर्शन घेण्यास चुक

लों याची माफी असावी.

जिजाबा०- शिवबा असें कोणचें बरें गडबडीचें काम होतें.

शिवाजी०- आई फारसें ह्मणावयासारखें होतें असें कांहीं नाहीं परंतु आमच्या कडून कांहीं पुंडावा चालला आहे त्याचेवरून मुसलमान यांचेमनांत फार वैमनस्य वाढत चाललें आहे त्याच प्रमाणें विजापूर सरकारचें दरबारांतून अफजूलखान सरकार फौज घेऊन आला आहे तरी त्याच्या भेटीस जावयाचे याकरितां मीं आई सरकाराचे भेटीस आलों आहे जर करितां आईसाहेबांची आज्ञा झालीतर आतां ह्या शत्रूचा समाचार घेतो बघा.

जिजाबा०- बरें शिवबा आपला काळ प्रतिकूळ आहे आणि तूं अशी खटपट करितोस त्या योगानें आपल्यास व तिकडे (विजापूरास शहाजी बादशाहाचे पदरीं असल्या कारणानें) दुःख मनांत आणलें ह्मणजे कांहींच चैन पडत नाहीं (असें ह्मणून डोळ्यास पाणी आणिते. )

शिवाजी०-(आईला दुःख झालें पाहून ) आईसाहेब आपण कांहीं एक मनांत आणूं नये बाबा साहेबाला त्या मुसलमानानीं दुःख देण्याचें मनांत आणलें आहे ह्मणून त्यांचा समाचार चांगलाच घेतों दुसरें आणखी कांहीं नाहीं.

जिजाबा०- शिवबा तूं मोठा शाहाणा आहेस मीं तुला सांगावें असें नाहीं माझ्या बोलण्याकडे लक्ष देऊन आपलें स्वहित होईल तसें कर ह्मणजे झालें.

शिवाजी०- आई साहेब आपल्या ह्मणण्या प्रमाणेंच करितों

( असें ह्मणून जावयास निघतो. )

जिजाबा०-( इतक्यांत स्मरण झाल्यासारखें करून. )अरे शिवबा, इकडे येऊन जा, तुलाजें रहस्य सांगावयाचें तें तर मीं सगळेंच विसरून गेलें बाबा पहिल्यानें भवानी आईचें दर्शन घेऊन मग आपले समर्थ गुरू रामदास स्वामी यांची भेट घेऊन तसेंच तूं आपल्या महालांतजाऊन आपल्या राणीस भेट ह्मणजे झालें याक्रमांत मात्र विसरूं नको.

( असें ह्मणून निघूनजातात. )

पडदा पडतो.

## प्रवेश ७वा.

( स्थळ सकवार बाईचा महाल. )

पात्रें.

शिवाजी, सकवार बाई, ( शिवाजीचीस्त्री. ) लवंगी दासी.



(सकवारबाई आपल्या महालांत बसले असतां पडदा उघडतो.

सकवा०-कोण आहेगे दासी?

लवंगी०-(मोठ्या घाबरेपणानें) जी बाईसाहेब, मी हायना लवंगी.

सकवा०-लवंगे, तुलाकाल सांगितलें होतें कीं हिराबागेंत जाऊन पुष्पशय्ये करितां सुगंधित नानाप्रकारचीं पुष्पें घेऊन ये ह्मणून त्याचेंग काय झालें.

लवंगी०-आपली आज्ञा झाली परमाणेंच व्हावें. लागलीच बागमधिं जाऊन लागलीच फुलें आनलींत आन रखमाजी खिजमतगाराजवळ दिल्याती.

सकुवार०-लवंगे तूं पुष्पें आणून रखमाजी जवळ दिलीं पण त्याणें अद्याप पुष्पाची शय्या केली नाहीं तर त्यास लवकर घेऊन ये.

लवंगी०-लई बेस हाय (असें ह्मणून त्यास घेऊन येते.)

रखमाजी०-(मुजरा करून) सरकार ही पहा फुलाची कावड गड्याच्या खांद्यावर देऊन आणिली आहे जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें करितों.

सकवार०-रखमाजी या फुलांची शय्या तयार करून ठेव.

रखमाजी०-आज्ञा सरकार (असें ह्मणून पुष्पाची शय्या करून ठेवितो. बहुतकरून सरकारची यावयाची वेळा झालीआहे.

सरकार०-लवंगे तूं आतां दरवाज्यावर जाऊन बैस आणि सरकार आल्यावर लागलीच मला वरदी दे.

लवंगी०-बाईसाहेब, लयी बेस, (असें ह्मणून निघून जाते.)

( इतक्यांत शिवाजी प्रवेश करितो. )

शिवाजी०- जनानखान्याच्या दरवाज्यावर कोण आहे.
लवंगी०- जीसरकार, मी लवंगी होय.
शिवाजी०- आंत जाऊन मीं आलों आहें ह्मणून वरदी दे.
लवंगी०- बरें जी सरकार (असें ह्मणून आंत जाऊन येते
शिवाजी०- (महालांत जाऊन मंचकावर बसतो. )
सकवार०- (लाजून मर्यादेनें एका बाजूस उभी राहाते. )
शिवाजी०- सरकार, आतां का असेंच उभें रहावयाचें आहे काय? माझे पाय दुखतात. इकडे येऊन सेजारीं बसा ह्मणजे समाधान होईल.
सकवार०- सरकारच्या आज्ञे बाहेर का मीं आहें ही पहा मीं आले मला तरी कुठे चैन पडते (असें ह्मणून अंकावर जाऊन बसते )
शिवाजी०- कां महाराज तबियत बराबर आहेना.
सकवार०- सरकारची पूर्ण दृष्टी या दासीवर असली ह्मणजे या दासीस काय कमी आहे पण बाई आज आपली प्रकृति असि चंचल कांबरें दिसते. मोहिमेवर का कोठें जावयाचें आहे.
शिवाजी०- होय सरकार, जावयाचें आहे तर गेल्याशिवाय सुटका तरी कशी होते ह्मणूनच आज्ञा घ्यावयास आलों. आणखी कांहीं नाहीं.
सकवार०- त्याचें नांव तर मला समजलें पाहिजे. ह्मणून काळजी करिते. मी आपल्या चरणसेवेंत सिद्धच आहें.
शिवाजी०- जर तुझी ऐकण्याची इच्छा असेल तर सांगतों.

आपल्याकडून कांहीं धामधूम देशांत चालली आहे ह्मणून विजापूरच्या बादशाहानें अफझूलखान ह्मणून एक सरदार पाठविला आहे त्याची भेट घ्यावया करितां जातों आणखी कांहीं नाहीं.

सकवा० - मला सरकारास अशी विनंती करणें आहे कीं आपल्या प्रकृतीस जपून जें काम होईल तें करा ह्मणजे झालें.

शिवाजी० - त्याच्या विषयीं तूं कांहीं काळजी करूं नको जगदंबेच्या कृपें करून सर्व संकटांतून पार पडून तुला भेटण्या करितां लौकरच येतों.

सकवा० - बरें आहे मीं आपणास सांगितलें आहे त्याचीमात्र आठवण ठेवा. ( असें ह्मणून गोविंद विडा देते. )

शिवाजी० - ( आलिंगन देतो ) आतां तूं स्वस्थ रहा ( जातो. )

सकवार० - लवंगे मला तुळसीची पूजा करावयाची आहे तिकडे चल

लवंगी० - लंइ बेस हाय ( निघून जातात. )

( नंतर पडदा पडतो. )

# प्रवेश ८ वा.

## ( स्थळ देवीचें मंदीर. )

पात्रें.

शिवाजी व पुजारी.



( पुजारी देवीचें द्वार उघडून पूजा करीत आहे इतक्यांत शिवाजी देवीचें दर्शन घ्यावयास प्रवेश करितो. )

शिवाजी०-मंदिरात कोण आहे.

पुजारी०- महाराज मीं रामाप्पा आहें. आई साहेबांची पूजा करून मंगलार्तीच्या तजविजींत आहें ( आरती करूं लागतो. )

### आरती देवीची.

॥ जयदेवी जयदेवी भगवति जय अंबें ॥ आदिमाये सुभगे तारी जगदंबे ॥ धृ० ॥ तुजविण संसारीया अज कवण ॥ तारी अज कवण ॥ श्रमित झालों माते रक्षी येकन ॥ जयदेवी जय०॥ १ ॥ महिषासुर जगतीवर मत्त बहू झाला ॥ मत्त बहू झाला ॥ सुरवर नागयातें अवतार धरिला ॥ जयदेवी० ॥ २ ॥

ब्रह्माविष्णू नमिती पद पंकज लेशा ॥ पद पंकज लेशा ॥ दास सखाराम ह्मणे वारी भवक्लेशा ॥ जयदेवीज० ॥ ३ ॥

( पुष्पांजुली करितां शिवाजीचे हातांत फुलें देते. )

शिवा०- ( तीं फुले देवीस वाहून स्तवन करितो. )

॥ पद ॥

( चाल पंचतुंड नर रुंड मालधर० )

॥ सुरवर नरमुनि असुर सेविती चरणकमळि तुज जगदंबे ॥ शाम मनोहर नारायणि गे ईशानी ये जगदंबे ॥ धृ० ॥ तुजविण कवणा शरण जाउं मी रक्षिल लज्जा कवण जनीं ॥ ऐसें वाटतें ह्मणुनि दिवस निशि भावें लागलों तव चरणीं ॥ सुर० ॥ १ ॥ यातायाती करितां श्रमलों मानसिं भ्रमलों श्रीमाते ॥ कायकरूं मज चैन पडेना पाहे सदोदित स्वार्थी तें ॥ सुर० ॥ २ ॥ ब्रह्मादिक अमरेंद्र ही स्तविती करुणाशाली जगमाये ॥ कूर्मदृष्टिनें पालन करिं गे संसारीं मन नच धाये ॥ सुर० ॥ ३ ॥ सखाराम ह्मणे जगज्जननि पद चिंतन करितां यश आहे ॥ इहपरसाधन सकल साधुनी पावे मोक्षपद लवलाहे ॥ सुरवर नरमुनि० ॥ ४ ॥ ॥ ❦ ॥ ॥ ❦ ॥

( असें स्तवन करितांच देवी प्रसन्न होते. )

देवी०- बालका त्वां ज्या कार्यास आरंभ केला आहेस तें तुझें कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल ( असें ह्मणून आपले हातांतील तरवार शिवाजीस देते. )

शिवाजी०- ( आनंदानें प्रसादरूपी तरवार घेऊन ) हे जगज्जननि कालिके तुझ्या कृपें करून या बालकाचे हेतू पूर्ण

होवोत हीच इच्छा आहे (वंदन करून निघून जातो.)

पूजा०-(देवीस महानैवेद्य समर्पण करून) आतां आपलें सर्व काम तर झालें. फुलें, तुळशी, दुर्वा, आणावयास जावयाचें आहे तर तिकडे जावें.

(निघून जातो.)

पडदा पडतो.

This book belongs to H. J. Ranade a student in the B. J. High School

## प्रवेश १ ला.

(स्थळ सज्जनगड.)

पात्रें.

(शिवाजी, रामदास स्वामी.)



शिवाजी० - (मनाशीं) भवानी आईचा प्रसाद होऊन तरही तरवार मिळाली आहे आतां कांहीं हरकत नाहीं. आ

तां तेवढीं गुरु महाराजांची भेट झाली ह्मणजे आपलें काम फत्तेच झालें समजा ( स्मरण केल्या सारखें करून ) समजलों. समर्थ रामदास स्वामी बहूतकरून सज्जनगडावरच असतील कारण कालच ते तिकडे गेल्याची बातमी आली होती तर गडावरच जावें ह्मणजे दर्शनलाभ होईल. ( गडावर जातो. )

( शिवाजी गडावर आला असतां रामदास स्वामी पर्णकुटिकेंतून मनाचे श्लोक ह्मणत बाहेर येतात. )

॥ श्लोक ॥

समर्थाचियासेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे। जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदां रामदासाभिमानी। १। जयजय रघुवीर समर्थ ॥ ॥

( असा श्लोक ह्मणत समर्थ बाहेर संचार करीत आहेत इतक्यां तशिवाजी पुढें येऊन वंदन करितो. )

शिवा०—( वंदन करून ) महाराज आपल्या कृपेंकरून या दासाचे सर्व हेतू परिपूर्ण होतात. परंतु सांप्रत विजापूरच्या दरबारांतून अफजुलखान ह्मणून एक सरदार माझ्यावर सैन्य देऊन पाठविला आहे तो मला भेटण्यास येऊन धरून न्यावें अशा बेतांत आहे करितां महाराज या दासास त्यासंकटांतून मुक्त करावें.

रामदास. श्लोक.

समर्थाचियासेवका वक्र पाहे॥ असा सर्व भूमंडळीं कोण आहे॥ जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही॥ नुपेक्षी कदां रामदासाभिमानी॥ १॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

शिवबा तूं कांहीं काळजी करूं नको. या भूमंडळावर समर्थाच्या सेवका

सवंकपहाणारा कोण आहे! सर्वसंकटांतून मुक्तकरणार सीतारा मसमर्थ आहे· आतां तूं आपल्या कार्यास गमन कर·

शिवा०-हातजोडून आज्ञा महाराज·( निघून जातो· )

( पडदा पडतो· )

## प्रवेश १०वा

( स्थळ किल्याचें मैदान· )

पात्रें·-शिवाजी,तानाजी मालुसरा,बाजी फसलकर,येसाजी कंक, दामाजीपंत व इतर मावळे वगैरे· )



शिवा०-(संतोषानें) कां तानाजीराव कसा काय रंग आहे? आपल्या कडील मावळे,हेटकरी,भंडारी,कोळी,रामोशी,या लोकांची तयारी कशी काय आहे·

तानाजी०-सरकार आपले हुकुमा परमान सर्व तयारी करून ठेविली आपल्या हुकुमाची चदेरी आहे या शिवाय दुसरें काहीं नाहीं·

बाजी०-सरकार त्या अफजुलखाना चें काय झालें तो भेटीस येणार तरी कधी तें समजलें ह्मणजे तशी तरतूद करण्यास ठीक पडेल·

शिवा०- कं कल्याचा असा विचार आहे कीं, गोपिनाथपंत यांचे मार्फत अफझुलखानास एकांतीं बोलावून कांहीं मसलत करण्याचे निमित्तानें चार गोष्टी बोलण्याचे गडबडींत त्याचे पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतों ह्मणजे झालें कां

ताना०- सरकार बेस मसलत काढलिया या परमान आपल्या कडून तयारी झाली असेलच.

दामा०- सरकार गोपिनाथ पंता बरोबर तो अफझुलखान आपल्या भेटीस येईल त्या वेळेस आपण असें ह्मणावें कीं सरदारलोकांचे शस्त्राचे देखावे पाहिले ह्मणजे मला फार भीती वाटते कारण आह्मी डोंगरी लोक असल्या कारणानें तो केवळ बाऊच आहे कीं काय याप्रमाणें होतें. याप्रमाणें बाहाणा करून आपण गुप्तरीतीनें आपल्या शस्त्राची सिद्धता नीट व्यवस्थेशिर ठेवावी. असें केल्यानें आपला कार्यभाग लवकरच होणारा आहे यांत कांहीं संशय नाहीं.

शिवा०- दिवाणजी तुमच्या ह्मणण्या प्रमाणेंच सर्व तजवीज केली आहे त्याजविषयीं कांहीं काळजी करूं नये आपल्या सरदारानीं मात्र मावळे लोक जागजागीं गुप्तपणें ठेवून त्यांचे बद्दल चांगली खबरदारी ठेवावी जर कदाचित प्रसंग पडलाच तर एकदम हल्ला करावयास बरें.

तानाजी०- सरकार हें काय आह्मांस नित्या गोष्टी सांगायास नि नग पहिलीच आपल्या ह्मणण्या प्रमाणें समदी तयारी करून शनी ठेविलिया.

दामाजी०- अहो मालुसरे तो पहा आपला गुप्त हेर आला आहे तो

सवकूपाहाणारा कोण आहे! सर्वसंकटांतून मुक्त करणार सीतारा मसमर्थ आहे. आतां तूं आपल्या कार्यास गमन कर.

शिवा०-हातजोडून आज्ञा महाराज.( निघून जातो. )

( पडदा पडतो. )

## प्रवेश १० वा

( स्थळ किल्याचें मैदान. )

पात्रें--शिवाजी,तानाजी मालुसरा,बाजी फसलकर,येसाजी कंक, दामाजीपंत व इतर मावळे वगैरे. )



शिवा०-(संतोषानें ) कां तानाजीराव कसा काय रंग आहे? आपल्या कडील मावळे,हेटकरी,भंडारी,कोळी,रामोशी,या लोकांची तयारी कशी काय आहे.

तानाजी०-सरकार आपले हुकुमा परमान सर्व तयारी करून ठेविली आपल्या हुकुमाचीच देरी आहे या शिवाय दुसरें काहीं नाहीं.

बाजी०-सरकार त्या अफजुल खानाचें काय झालें तो भेटीस येणार तरी कधी तें समजलें म्हणजे तशी तरतूद करण्यास ठीक पडेल.

शिवा०- कं कल्याचा असा विचार आहे कीं, गोपिनाथपंत यांचे मा फैत अफझुलखानास एकांतीं बोलाबून कांहीं मसलत करण्याचे निमित्तानें चार गोष्टी बोलण्याचे गडबडींत त्याचे पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतों ह्मणजे झालें कां

ताना०- सरकार बेस मसलत काढलिया या परमान आपल्या कडून तयारी झाली असेलच॰

श्यामो०- सरकार गोपिनाथ पंता बरोबर तो अफझुलखान आपल्या भेटीस येईल त्या वेळेस आपण असें ह्मणावें कीं सरदारलोकांचे शस्त्राचे देखावे पाहिले ह्मणजे मला फार भीती वाटते कारण आह्मी डोंगरी लोक असल्या कारणानें तो केवळ बाऊच आहे कीं काय या प्रमाणें होतें॰ या प्रमाणें बाहाणा करून आपण युक्तीनें आपल्या शस्त्राची सिद्धता नीट व्यवस्थेशिर ठेवावी॰ असें केल्यानें आपला कार्यभाग लवकरच होणारा आहे यांत कांहीं संशय नाहीं॰

शिवा०-दिवाणजी तुमच्या ह्मणण्या प्रमाणेंच सर्व तजवीज केली आहे त्याजविषयीं कांहीं काळजी करूं नये आपल्या सरदारानीं मात्र मावळे लोक जागजागीं गुप्तपणें ठेवून त्यांचे बद्दल चांगली खबरदारी ठेवावी जर कदाचित प्रसंग पडलाच तर एकदम हल्ला करावयास बरें॰

तानाजी०-सरकार हें काय आह्मांस नित्या गोष्टी सांगायास निगपहिलीच आपल्या ह्मणण्या प्रमाणें समदी तयारी करून ठेविलिया॰

श्यामाजी०-अहो मालुसरे तो पहा आपला गुप्त हेर आला आहे तो

असें सांगतो कीं गोपिनाथ पंतास बरोबर घेऊन अफजुलखानज वळचे माळावर आला आहे बहूकरून या ठिकाणीं यावयाचीस धींच आहे

शिवा० - ठीक आहे आतां आपण किल्याचे तटावर जाऊन पाहूंया ह्मणजे तो कोणत्या थाटानें आला आहे हें समजेल.

ताना० - चलातर ( असें ह्मणून सर्व निघून जातात. )

प्रवेश ११ वा.

(स्थळ किल्यांतील मैदानातील तंबू. )

पात्रें:

शिवाजी, तानाजी, गोपिनाथपंत, दामाजीपंत, अफजुलखान.



गोपि० (अफजुलखान ) खाविंद तो पहा शिवाजी, दामोदरपंत आणि तानाजी हे आपल्यासमोर आले आहेत.

अफ० - क्यों गोपिनाथपंत ये क्या शिवाजी है हमको देखके बहोत डरता है लेकिन उसको समजा देवो.

गोपि० - खाविंद शिवाजी हा फार भिव्या स्वभावाचा आहे करितां

आपण तंबूत शस्त्रावांचून जावें. आपल्या बरोबर मींही येतों: दुसरें कोणी घ्यावयास नको.

अफ०-बहोत अच्छा है (असें ह्मणून भेटावयास जातो.)

शिवा०- कां गोपिनाथपंत आपल्या हुकमाप्रमाणें तयारीके ली आहे खानसाहेबाला पाहून माझ्या मनाला फार भीती वाटते.

गोपि०- शिवाजीराव आपण खानसाहेबाची भेट घेऊन जें बोलणें असेल तें बोलावें.

शिवा०- गोपिनाथपंत आपण खानसाहेबाच्या भेटीचा योग आणिलात नाहींपेक्षां असा व्हावयाचा नाहीं.

गोपि०- ठीक आहे (खानसाहेबास) साहेब चला ते शिवाजी आले आहेत.

अफ०-(शिवाजीजवळ जावयास येतो व शिवाजी त्याजला भेटण्याच्या निमित्यानें येऊन त्याच्या पोटांत वाघनखें खोंवितो (उघड) दगा आहे या अल्ला रहीम सुलतान (असें ह्मणून घायाळ पडतो) व शिवाजी, अफजूलखान घायाळ पडलेला पाहून त्याचें विचवाया नांवाचें शस्त्र सोडून घेऊन त्याचा प्राण घेतो. (नंतर पडदा पडतो.)



## प्रवेश १२वा.

(स्थळ साताऱ्याचा किल्ला.)

पात्रें:-शिवाजी तानाजी दामाजीपंत व गोपिनाथ पंत.



गोपि०-सरकार आपल्या ह्मणण्याप्रमाणें खानाचा तर नाश झा ला आतां आपण सुखानें नांदा.

शिवा०-गोपिनाथपंत ही सर्व जगदंबेची कृपा समजली पाहिजे.

ताना०-कसेंकाय दामाजीपंत आपले सरकारचा समदं काम नडीस गेलें आतां बेस झालें ना.

शि०-दामोदरपंत आतां अगोदर या गोपीनाथ पंतास हिवरे गांवची सनद करून द्या ह्मणजे झालें.

दामा०-(आज्ञेप्रमाणें सनद लिहून आणतो) महाराज याचेवर शिक्के मोर्तब करा.

शिवा०-ठीक आहे (असें ह्मणून त्या सनदेवर शिक्का मोर्तब करितो) गोपिनाथ पंत ही घ्या सनद आली या मराठ्यांची गादी राखाह्म झालें

गोपि०-(मुजरा करून) आज्ञा सरकार (असें ह्मणून खाली बसतो.)

दामा०-सर्वांस पान सुपारी देऊन सर्वांचा सन्मान करितात.

(सर्व विधी आटपल्यावर सर्व जण निघून जातात.)

समाप्त.